Subject Code **J-284**

Seat No. | | | | | | | |

M

DATE : 25/06/2026

Time : 11.00 - 2.00

SUBJECT : ORGANISATION OF COMMERCE AND MANAGEMENT (51)

DURATION : 3 Hours   TOTAL PAGES : 5   TOTAL MARKS : 80

सूचना :
(i) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
(ii) उजव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.
(iii) डाव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे क्रमांक दर्शवितात.
(iv) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराची सुरुवात नवीन पानावर करावी.

प्र.१. (अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा : (५) २०

(i) ------ व्यवस्थापनाने बनविलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी संघटन हे एक महत्त्वाचे कार्य आहे.

(अ) उच्च स्तरीय (ब) मध्यम स्तरीय

(क) कनिष्ठ स्तरीय

(ii) ऑनलाइन व्यवहार करण्यास ------ आवश्यक असते.

(अ) नोंदणी (ब) व्यापार

(क) व्यवसाय

(iii) नीतिशास्त्र (ethics) ही संज्ञा --- भाषेतील 'एथॉस' या शब्दापासून घेतली आहे.

(अ) लॅटीन (ब) फ्रेंच

(क) ग्रीक

(iv) फळे, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ, इत्यादी नाशवंत वस्तूंची विक्री ------ बाजारपेठेत केली जाते.

(अ) अत्यल्प कालावधीच्या (ब) अल्प कालावधीच्या

(क) दीर्घ कालावधीच्या

(v) हवाई वाहतूक हा वाहतुकीचा सर्वात ———— प्रकार आहे.

(अ) स्वस्त (ब) महाग

(क) विनामूल्य

(ब) खालील विधानांसाठी एक शब्द / शब्दसमूह / संज्ञा सुचवा : (५)

(i) तार्किक विचारांची आणि तर्कशुद्ध निर्णय घेण्याची ही एक बौद्धिक प्रक्रिया आहे.

(ii) इंटरनेटच्या मदतीने केले जाणारे व्यवहार.

(iii) आरोग्य आणि जीवितास संरक्षण व सुरक्षितते संबंधीचा ग्राहकाचा हक्क.

(iv) वस्तूंचे उत्पादन एका देशात आणि विक्री दुसऱ्या देशांमध्ये असणाऱ्या बाजाराचे नाव.

(v) एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे कल्पना, वस्तुस्थिती, माहिती, इत्यादीचे देवाणघेवाण करण्याची कला.

(क) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्ये पुन्हा लिहा : (५)

(i) संघभावनेचे तत्त्व म्हणजे विभागणी हीच शक्ती होय.

(ii) निर्देशन हे प्रत्यक्ष कामगिरी व पूर्वनियोजित कामगिरी यांची तुलना करण्याचे कार्य आहे.

(iii) योग्य किंवा अयोग्य या नीतीनियमांवर सामाजिक मूल्ये अवलंबून असतात.

(iv) भारतात विक्रेते विखुरलेले असून ते असंघटित आहेत.

(v) प्रतवारीमुळे वस्तूची मोडतोड, नुकसान व हानी टाळण्यास मदत होते.

(ड) कंसातील पर्यायांमधून अचूक पर्याय निवडून तक्ता पूर्ण करा : (५)

[ई-व्यवसाय, देशाची शिखर बँक, शासनाप्रति जबाबदारी, २०१९, गोदाम]

'अ' गट	'ब' गट
(i) मध्यवर्ती बँक	----------------
(ii) ----------------	वेळ आणि स्थल उपयोगिता
(iii) ई-वाणिज्यचा महत्त्वाचा संच	----------------
(iv) योग्य वेळेत कर भरणा	----------------
(v) --------------	ग्राहक संरक्षक कायदा

प्र.२. खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा (कोणत्याही चार) : [८]

(i) वेळ अभ्यास
(ii) निर्देशन
(iii) गोदामे
(iv) जिल्हा आयोग
(v) कुरिअर सेवा
(vi) कर्मचारी व्यवस्थापन

प्र.३. खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा (कोणतेही दोन) : [६]

(i) श्री. शरण एक यशस्वी उत्पादक आहेत. त्यांच्या विविध ठिकाणी उत्पादनाच्या शाखा असून त्यांच्याकडे कच्चा आणि उत्पादित मालाचा मोठ्या प्रमाणात साठा आहे. त्यांना कोणत्याही अनपेक्षित आर्थिक धोक्यापासून मालाच्या संरक्षणासंबंधी काळजी वाटते. तसेच त्यांना कच्चा व उत्पादित माल एका शाखेतून दुसऱ्या शाखेत पाठवावा लागतो. परंतु त्यांच्याकडे त्यासाठीची कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. त्यांना व्यवसाय विस्तारासाठी निधीची सुद्धा आवश्यकता आहे.

(अ) त्यांना मालाचे सर्व प्रकारच्या धोक्यापासून संरक्षण देणारी सेवा सुचवा.

(ब) कोणती सेवा त्यांना जागेचा अडथळा दूर करण्यासाठी उपयोगी ठरेल?

(क) कोणत्या सेवेद्वारे श्री शरण अर्थसाहाय्य मिळवू शकतात?

(ii) अजय www.flipkart.com या वेबसाईटवरून काही भेटवस्तू ऑनलाइन खरेदी करतो. त्याचवेळी ज्योती e.bay.com या वेबसाईटवरून भेटवस्तू खरेदी करते.

(अ) C2C शी संबंधित वेबसाईट कोणती?

(ब) B2C शी संबंधित वेबसाईट कोणती?

(क) अजयने ऑनलाइन व्यवहार करताना कोणती पहिली पायरी अनुसरण करावी?

(iii) संज्योत कंपनी लिमिटेड आपल्या महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या लहान बालकांसाठी पाळणाघर व घरात थांबूनच काम करण्याची सवलत देते. जरी ते कामगार संघटनांचे सभासद असले तरी, व्यवस्थापन निर्णय घेण्यापूर्वी त्यांच्या सूचनांची दखल घेते.

(अ) ही कृती करत असताना ते कोणत्या घटकांविषयी सामाजिक जबाबदारी पार पाडतात?

(ब) कंपनीकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली कोणतीही एक सुविधा लिहा.

(क) वरील घटनांमध्ये मालक कोणत्या प्रकारच्या जबाबदारीचे अनुसरण करतात?

प्र.४. फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : **१२**

(i) रस्ते वाहतूक आणि रेल्वे वाहतूक

(ii) समन्वय आणि नियंत्रण

(iii) राज्य आयोग आणि राष्ट्रीय आयोग

(iv) जीवन विमा आणि सागरी विमा

प्र.५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **८**

(i) व्यवस्थापन तत्त्वांचे महत्त्व सांगणारे कोणतेही चार मुद्दे स्पष्ट करा.

(ii) ग्राहकांचे कोणतेही चार अधिकार / हक्क स्पष्ट करा.

(iii) क्षेत्रानुसार आणि कालानुसार विपणीचे प्रकार स्पष्ट करा.

प्र.६. खालील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) : ८

(i) नियोजन हे व्यवस्थापनाचे प्रथम कार्य आहे.

(ii) ग्राहक संरक्षणात ग्राहक संघटना आणि अशासकीय संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे.

(iii) इ-व्यवसाय जागतिक पातळीवर कोणत्याही क्षेत्रात काम करण्याची मुभा देतात.

(iv) व्यवसाय संघटनांवर प्रभाव टाकण्यासाठी माध्यमांची भूमिका महत्त्वाची असते.

प्र.७. खालील प्रश्न सोडवा (कोणतेही दोन) : १०

(i) हेन्री फेयॉल यांची व्यवस्थापनाची कोणतीही पाच तत्त्वे स्पष्ट करा.

(ii) उद्योजकाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(iii) समाजासाठी विपणनाचे असणारे महत्त्व स्पष्ट करा.

प्र.८. खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा (कोणतेही एक) : ८

(i) विपणन म्हणजे काय? विपणनाची विविध कार्ये स्पष्ट करा.

(ii) बँकेचा अर्थ सांगून व्यावसायिक बँकेची प्राथमिक कार्ये स्पष्ट करा.

◆◆◆